## एक तत्व परमात्मा...

हा माझा तो त्याचा, दृष्टीचा सारा खेळ आहे
फरक करणे हाच मुळी, बुद्धिभेदाचा खेळ आहे ॥ १ ॥

कुणाचा प्यारा कुठला वार, देव एक आवडीचा
अरे वेड्या ऐकले कधी?, अमुक देव नावडीचा? ॥ २ ॥

नद्या वाहती चहू दिशांना, मूलतत्व पाणी जीवन होय
मनी देव असेल कोणताही, मूलतत्व परमात्मा होय ॥ ३ ॥

झाडे उगवती शेकडो वनी, कारण फळे शीतल छाया होय
असती वेली फुले कितीक, उद्देश निर्मळ सुगंध होय ॥ ४ ॥

धर्म कसला जात कसली, तयार मनुष्याने केली
परमात्म्याने का कुठे कधी?, जात-पंथाची आज्ञा केली? ॥ ५ ॥

कोणी करतो वारी; कोणी साधतो भक्तीपूजा
कोणी नवस सायास; कोणी मानतो मानसपूजा ॥ ६ ॥

मूर्ती प्रतिमा आकार काही; भगवंत निर्गुण निराकार
देवात कसली आवड-निवड, तो अंतिम सत्य विचार ॥ ७ ॥

©सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78